गजानन पाळेकर

# सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),कुडाळ यांचे कार्यालय

कार्यालय- कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

---

## राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ कसाल ते झाराप (कि.मी.४१९/८०० ते ४५०/१७०)

# :: भूसंपादन पुरक निवाडा २ ::

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ (१९५६ चा कायदा ४८) कलम 3G (१) अन्वये नुकसान भरपाई आदेश

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०४/२०१४

| | |
|---|---|
| मुल्यांकन दिनांक | :- सन २०२३ |
| आदेश दिनांक | :- २६.१२.२०२३ |
| गावाचे नांव | :- वाडीहुमरमळा |
| तालुका | :- कुडाळ |
| जिल्हा | :- सिंधुदुर्ग |

क्र.भूसं/पुरक निवाडा/वाडीहुमरमळा/एसआर ०४/२०१४
सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय कुडाळ
दिनांक - २६.१२.२०२३

विषय:- राष्ट्रीय महामार्ग क्र. (जुना १७) चौपदरीकरणासाठी भुसंपादन भुसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण,पुन:स्थापना आणि पुनर्वसन अधिनियम २०१३, सुधारित २०१५ व राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ अन्वये अंतिम निवाडयामध्ये राहुन गेलेल्या बाधीत बांधकामाचे मुल्यांकन निश्चिती (नुकसान भरपाई) मौजे:- वाडीहुमरमळा ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग

पुरक निवाडा

वाचले:-

१) प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (सडक परिवहन व राज्यमार्ग मत्रालय भारत सरकार) यांजकडील पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ राजापूर ते झाराप (NH-६६) कि.मी. ३५१.०० ते ४५०.१७० विस्तारीत करण्यासाठी व नामनिर्देशन करणेसाठीचे पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे पत्र.क्र. १६०२६/१४०/२०१३-COLL-REV दि.१९/०९/२०१३ नुसार भूसंपादन प्रक्रिया पार पाडण्याकरिता उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांचे नामनिर्देशन अधिसूचीत करणेत आलेले आहे.
२) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३(a) अन्वये राज्यमार्ग व सडक परिवहन विभाग भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील क्र. का.आ.३९(अ)अधिसूचना प्रसिद्ध दिनांक ७ जानेवारी २०१४ अन्वये राष्ट्रीय महामार्ग १७ (नविन-६६) करिता उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.
३) कार्यकारी अभियंता, दक्षिण सा.बा.विभाग, रत्नागिरी यांचेकडील पत्र क्रमांक जावक क्र.दरवि/प्रशा/चौप./भूसंपादन/४७६,दि.२४/०२/२०१४ अन्वये मौजे वाडीहुमरमळा, ता.कुडाळ, जि. सिंधुदुर्ग जमीन संपादनाबाबतचा प्रस्ताव.
४) उपअधिक्षक भूमि अभिलेख, कुडाळ यांजकडील मो.र.नं.१३७, दि.२७/०३/२०१५ अन्वये मौजे वाडीहुमरमळा, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील प्राप्त झालेले संयुक्त मोजणी पत्रक व नकाशाशीट.
५) क्र.एल.क्यू.एन/१२/२०१३ प्र.क्र.१९०/अ२ ज्या अर्थी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) महसूल व वनविभाग मुंबई अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ अ मधील असाधारण क्रमांक ७०, दि. २५ मे, २०१५.
६) भारतीय राजमार्ग प्राधिकरण नवी दिल्ली यांचे पत्र क्र.NHAI/११०/०३/dmg(L.A.& Coord)२०१५/FTS-४१७/७०६८९, दि.२४/०८/२०१५.
७) उपसचिव. महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांजकडील पत्र क्र.संकीर्ण-१०/२०१५/प्र.क्र.१३३/अ-२, दि.०५/१०/२०१५.

८) राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग भारत सरकार, नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग ॥ खंड ३-उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३(A) अधिसूचना का.आ. ३१८६ (अ) प्रसिद्ध दिनांक २६.११.२०१५ व दैनिक तरुण भारत व दैनिक प्रहार वृत्तपत्र दिनांक १८.१२.२०१५.

९) कलम ३ C नुसार प्राप्त हरकतींच्या अनुषंगाने आक्षेप अर्जावर सुनावणी दि.२८.०१.२०१६

१०) भारत सरकार असाधारण अधिसूचना दि. ०९.०२.२०१६

११) भारत सरकार, Ministry of Road Transport & Highway यांजकडील पत्र क्रमांक No.RW/MUM/11016/1/2015-16/684 Dated 13.04.2016

१२) सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग ॥ खंड ३ - उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३ (D) अधिसूचना का.आ. २०६७ (अ) प्रसिद्ध दिनांक १०.०६.२०१६ व दैनिक प्रहार व दैनिक पुढारी वृत्तपत्र दिनांक २५.०७.२०१६

१३) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांजकडील पत्र क्र.संकिर्ण/०३/२०१६/सं.क्र.२७०/अ२ दि. २८.१०.१६

१४) सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग ॥ खंड ३- उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३(A) नुसार पुरवणी अधिसूचना का.आ. ४०७३ (अ) व ४०७४ (अ) प्रसिद्धी राजपत्र दिनांक-१६/१२/२०१६ व दैनिक सिंधुदुर्ग टाईम्स व दैनिक पुढारी वृत्तपत्र दिनांक ०४/०३/२०१७.

१५) कलम ३ C नुसार प्राप्त हरकतींच्या अनुषंगाने आक्षेप अर्जावर सुनावणी दि.१७/०५/२०१७

१६) सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग ॥ खंड ३- उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३(D) पुरवणी अधिसूचना का.आ. ३८५३(अ) प्रसिद्ध दिनांक ०८/१२/२०१७ व दैनिक प्रहार व दैनिक पुढारी वृत्तपत्र दि.१०/०१/२०१८.

१७) भारत सरकार, Ministry of Road Transport & Highway यांजकडील पत्र क्रमांक No.NH-११०११/३०/२०१५LA दि.२८/१२/२०१७ (GUIDELINES)

१८) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण-०१/२०१८, प्र.क्र.११/अ-२, दि.०४/०४/२०१८.

१९) नगर रचनाकार सिंधुदुर्ग यांजकडील पत्र जा.क्र.भूसंपादन/कुडाळ/रा.म.मा.क्र.६६/ गुणांक/नरसिं-९८९, दि.१७/०५/२०१८.

२०) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी यांजकडील जा.क्र.सावाडी/प्रशा/ आस्था/१/२०१८/६८८८, दि. १५.१०.२०१८ अन्वये संपादित जमिनीवरील बांधकाम मुल्यांकन अहवाल.

२१) उपअधिक्षक भूमि अभिलेख, कुडाळ यांजकडील पत्र क्र. भूमापन/भूसंपादन/रा.म.मा.६६/वाडी हुमरमळा/ आ.क्र.२८०१/२०२३/जा.क्र.२८४, दि.१६.०२.२०२३

२२) या कार्यालयाकडील पत्र क्र.भूंसपादन/रा.म.मा. ६६/तक्रार/स्थळपहाणी/२३ दिनांक २५.०५.२०२३

२३) प्रशासक, ग्रामपंचायत हुमरमळा यांचेकडील पत्र ग्रा.पं./जाक्र/३९४/२३-२४ दिनांक २६.१०.२०२३

१. प्रस्तावना:-

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ (जुना क्र.१७) हा पनवेल ते कन्याकुमारी असा स्थित असुन महाराष्ट्र गोवा, कर्नाटक, केरळ व तामिळनाडू या राज्यातुन जातो. सदर राष्ट्रीय महामार्ग हा देशातला ७ वा सर्वात जास्त

लांबीचा महामार्ग म्हणुन हा प्रसिध्द आहे. महाराष्ट्रामधील सिंधुदुर्ग जिल्हातील कुडाळ उपविभागातील या महामार्गची लांबी सुमारे ३०.३७० कि.मी. आहे. त्यापैकी मौजे वाडीहुमरमळा ता. कुडाळ या गावाची महामार्गाची लांबी सुमारे ३.१५ कि.मी. एवढी आहे. सदर महामार्गाच्या रुंदीकरणासाठी भूसंपादनाकरिता वरील वाचले क्र. २ नुसार उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांची त्यांचे कार्यक्षेत्रापुरती सक्षम प्राधिकारी म्हणुन नेमणुक झाली आहे. तसेच वाचले क्र. १ नुसार जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांना सक्षम प्राधिकारी म्हणुन जाहीर केलेले आहे. या कार्यालयाकडील निवाडयामध्ये झालेली तांत्रिक दुरुस्ती करणेसाठी सदर पुरक निवाडा करण्यात येत आहे.

या प्रकरणी संपादन संस्था म्हणुन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण) रत्नागिरी यांच्या वाचले क्र. ३ नुसार संपादन प्रस्ताव सक्षम प्राधिकरण यांजकडे दाखल झाला. त्यानंतर उपअधिक्षक भुमी अभिलेख कुडाळ यांजकडे संयुक्त मोजणी नकाशा व संयुक्त मोजणी पत्रकानुसार राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३ अे ची प्राथमिक अधिसुचना वाचले क्र. ८ व १४ अन्वये व कलम ३ डी ची अधिसुचना वाचले क्र. १२ व १६ अन्वये भारत सरकार राजपत्रामध्ये प्रसिध्द झाली. सदर अधिसुचना प्रत्येकी २ स्थानिक वृत्तपत्रामध्ये हिंदी व इंग्रजी मध्ये प्रसिध्द करुन प्राप्त हरकतीवर सुनावणी करण्यात आली. त्यानंतर जमिनीची नुकसान भरपाई खरेदी विक्री व्यवहार व सिघ्रसिध्द गणकातील दस्तसंच यानुसार महामार्गालगत जमिनीचे दर सर्वांत जास्त असल्याने जमिनीचा दर मुळ निवाडयात रु. ८३,०००/- व पुरवणी निवाडयात रु. ८९,०००/- असा निश्चित करण्यात आला. संपादित जमिनीचे व बाधीत बांधकामाचे मुल्यांकन संकलीत करुन दिनांक ३०.११.२०१६ व दिनांक १५.१०.२०१८ अन्वये मौजे वाडीहुमरमळा या गावाचा अनुक्रमे मुळ व पुरवणी घोषित करण्यात आलेला आहे. सदर बाधित बांधकामाचा मोबदला यापूर्वीच्या निवाडयात घेण्यात आलेला नसल्याने बाधित बांधकामधारकांना मोबदला अदा करण्यांत आलेला नाही.

२. बाधित बांधकामधारक यांचा अर्ज व त्यावरील कार्यवाही

प्रस्तुत निवाडा घोषित झाल्यानंतर संपादित क्षेत्रातील इमारत बांधकामाचे मुल्यांकन झालेले नसल्याबाबत बांधकामधारक गजानन वासुदेव पालव यांनी या कार्यालयाला अर्ज केलेला आहे. इमारत क्र. ५९४ चा नमुना नं. ८ च्या उता-यानुसार इमारत मालक सदरी गजानन वासुदेव पालव यांचे नांवे दिसून येते. मौजे वाडीहुमरमळा ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग येथील गट नं. १७३३ पैकी संपादित जमिनीतील इमारत क्र. ५९४ या बांधकामाचे मुल्यांकन मुळ व पुरवणी निवाडयामध्ये घेण्यात न आल्याने सदर मोबदला संबंधीत खातेदारांना आदा करण्यात आलेला नाही. सदर संपादित क्षेत्रातील इमारत बांधकामाचा मोबदला मिळणेबाबतच्या अर्जावर कार्यवाहीसाठी दिनांक ०७.१२.२०२२ च्या पत्राने उपअधिक्षक, भूमी अभिलेख कुडाळ यांजकडे पाठविणेत आले. संयुक्त पहाणीच्या अनुषंगाने उपअधिक्षक, भूमी अभिलेख कुडाळ यांनी वाचले क्र. २२ नुसार दिनांक

१६.०२.२०२३ ने दुरुस्त संयुक्त मोजणी पत्रक व दुरुस्त मोजणी नकाशा या कार्यालयात सादर केलेला आहे. वाचले क्र. २१ नुसार सादर केलेल्या दुरुस्त संयुक्त मोजणीपत्रकानुसार बाधित होत असलेल्या बांधकामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| संयुक्त मोजणी पत्रकाप्रमाणे | | | | दुरुस्त संयुक्त मोजणी पत्रकाप्रमाणे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ग.नं | प्रकार | क्षेत्र | इमारत | ग.नं | प्रकार | क्षेत्र | इमारत |
| १७३३ पै. | वरकस | ०-०६-५० | ० | १७३३ पै. | वरकस | ०-०६-५० | १ |

संबंधित विभागाने सादर केलेल्या अहवालानुसार वाढीव जमिनीची मागणी करणेत आलेली नाही. मात्र संपादित क्षेत्रातील एक इमारत बाधित होत असल्याचे दिसून येते. सदर बाधित इमारत क्र. ५९४ चे मुल्यांकन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग सावंतवाडी यांजकडून प्राप्त करुन घेण्यात आलेले आहे. सदर बांधकामाचे मुल्यांकन यापुर्वी झालेले नसल्याने मुळ व पुरवणी निवाडयामध्ये सदर बांधकामांचा मोबदला काढण्यात आलेला नाही. सदरचे बांधकाम जरी यापुर्वीच्या मुल्यांकन अहवालामध्ये घेण्यात आलेले नसले तरी संयुक्त सर्वेक्षणानुसार व उपअधिक्षक भूमि अभिलेख कुडाळ यांचेकडील वाचले क्र. २१ नुसार सदर बांधकाम संपादित क्षेत्रामध्ये बाधीत होत आहे. उपअधिक्षक, भूमी अभिलेख कुडाळ यांचेकडील प्राथमिक व सुधारीत संयुक्त मोजणीपत्रकामध्ये वरील बाधित बांधकामाचा समावेश न केल्याने संबंधित यंत्रणेंकडून मुल्यांकन करणेत आलेले नव्हते. सबब बाधीत बांधकामाचे मुल्यांकन दिनांक ३०.११.२०१६ दि. १५.१०.२०१८ रोजी घोषीत केलेल्या मुळ व पुरवणी निवाडयामध्ये घेण्यात आलेले नाही. सदयस्थितीत सदर बाधीत बांधकामाची नुकसान भरपाई इमारतधारकास देय भरपाई बांधकामधारकास देय आहे.

३. बाधित बांधकामाचे मुल्यांकन व त्यानुसार देय रक्कम :-

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी यांचेकडून सदर बाधित बांधकामाचे मुल्यांकन अहवाल प्राप्त झालेला आहे. सदर मुल्यांकन अहवालाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| गांव/ग.नं. | घर नंबर | तपशिल | | | | मुल्यांकन रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बांधकामाचा प्रकार | क्षेत्रफळ | दर | मुल्यांकन | |
| वाडीहुमरमळा १७३३ पै | ५९४ | इमारत | ५१.७१२ चौ.मी. | १०३८०/- | ५,४५,०४४.५० | ५,४५,०४४.५० |
| एकूण | | | | | ५,४५,०४४.५० | |

उक्त मुल्यांकन अहवालानुसार मौजे वाडीहुमरमळा येथील ग.नं. १७३३ या जमीन मिळकतीमधील बाधित बांधकामांच्या देय मोबदल्याची परिगणना खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | गट नं. | घर पत्रकाप्रमाणे घर मालकाचे नांव | संपादन क्षेत्रात येणाऱ्या बांधकामांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | दुरुस्त मोजणी पत्रकाप्रमाणे | | मुल्यांकन अहवालाप्रमाणे | |
| | | | बांधकामाचा प्रकार | बांधकामाची संख्या | बांधकामाचा प्रकार | ग्रा.प. घर नं. |
| १ | २ | ३ | ४अ | ४ब | ५अ | ५ब |
| १ | १७३३ पै | श्री. गजानन वासुदेव पालव | इमारत | १ | इमारत | ५९४ |
| | | एकूण | - | - | - | - |

| मुल्यांकन रक्कम | कलम ३०(१) प्रमाणे दिलासा रक्कम १००% | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ६ | ७ | ८ | ९ |
| ५,४५,०४४.५० | ५,४५,०४४.५० | १०,९०,०८९.०० | दुरुस्ती मोजणी पत्रकात नव्याने सामाविष्ट |
| ५,४५,०४४.५० | ५,४५,०४४.५० | १०,९०,०८९.०० | - |

४. नविन भूसंपादन कायदा २०१३ चे कलम ३० (१)अन्वये १००% दिलासा रक्कम:-

भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण पुन:स्थापना आणि पुनर्वसन अधिनियम २०१३ चे कलम ३० (१) प्रमाणे संपादित जमिनीचा भरपाई रक्कमेचा (जमिनीशी जोडलेल्या सर्व घटकाच्या मुल्यांकन सह ) एकूण नुकसान भरपाई रकमेवर १००% दिलासा रक्कम भरपाई म्हणुन देण्यात येत आहे.

५. आस्थापना खर्च:-

प्रस्तुत पुरक भूसंपादन प्रस्तावना राज्य शासनाच्या प्रचलित कायदयानुसार आस्थापना खर्चाची रक्कम एकूण देय रक्कमेवर १.५०% प्रमाणे आकारलेली असुन ती रक्कम ₹ १६,३५१/- आदेशात समाविष्ट केलेले आहे. सदर रक्कम सक्षम प्राधिकारी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तथा उपविभागीय अधिकारी कुडाळ यांचे स्विय प्रपंजी लेख्यामध्ये तात्काळ जमा करावयाची आहे.

६. सोई सुविधा खर्च:-

तसेच प्रस्तुत भूसंपादन प्रस्तावना राज्य शासनाच्या प्रचलित कायदयानुसार सोई सुविधा खर्चाची एकूण देय रकमेवर १% आकारणी असुन ₹ १०,९०१/- आदेशात सामिल केलेली आहे. सदर रक्कम सक्षम प्राधिकारी भारतीय राष्ट्रीय महामार्ग तथा उपविभागीय अधिकारी कुडाळ यांचे सदर स्विय प्रपंजी लेख्यामध्ये तात्काळ जमा करावयाची आहे.

७. नुकसान भरपाई रक्कमेचा तपशिल:-

भुसंपादनातील योग्य भरपाईचा अधिकार प स्थानांतरण व पुर्नस्थापना आणि पुर्नवसन २०१३ मधील २७ व २८ प्रमाणे मोबदला रक्कमेची निश्चिती करताना यापुर्वी कलम १६ (१) प्रमाणे निश्चित करण्यात आलेले जमिनीचे बाजारमुल्य दर व संपादनात असणा-या इमारत बांधकामे व झाडे मुल्यांकनात अंतभुर्त करणे आवश्यक आहे. सदर बाबींचा विचार करून यापुर्वीच्या निवाडयामध्ये मुल्यांकनात न घेतलेल्या इमारत बांधकामांची मोबदला रक्कम या पुरक निवाडयामध्ये निश्चित करण्यात येत आहे.

उक्त कायदयाच्या कलम ३० (२) आणि परिशिष्ट १ अन्वये मौजे वाडीहुमरमळा येथील या पुर्वीच्या निवाडयामध्ये न घेतलेल्या बाधीत बांधकामाची मोबदला रक्कम पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | बाधीत बांधकामाचे मुल्यांकन | ५,४५,०४४.५० |
| २. | दिलासा रक्कम १००% प्रमाणे | ५,४५,०४४.५० |
| | एकूण (१+२) | १०,९०,०८९.०० |
| ४. | आस्थापना खर्च १.५०% प्रमाणे | १६३५१.०० |
| ५. | सोई सुविधा खर्च १.००% प्रमाणे | १०९०१.०० |
| | एकूण रक्कम ₹ | ११,१७,३४१.०० |

८. मोबदला वाटप प्रक्रिया:-

याप्रमाणे निर्धरीत करणेत आलेली पुरक निवाडा रक्कम राष्ट्रीय महामार्ग कायदयाच्या कलम ३ एच (१) मधील तरतुदीप्रमाणे केंद्रशासनाव्दारे सक्षम प्राधिकारी यांचेकडे जमा करावी. याप्रमाणे निवाडा रक्कम सक्षम प्राधिकरण यांचे जमा केल्यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३ एच (२) अन्वये सक्षम प्राधिकारी केंद्र शासनाच्या वतीने या निवाडयाव्दारे संपादित क्षेत्रातील पात्र हितसंबंधीत व्यक्तीना त्यांच्या बाधीत बांधकामाच्या हिश्श्यानुसार रक्कमेचे वाटप करतील व त्यांचेकडून बाधीत बांधकामाचा व त्याखालील संपादित क्षेत्राचा ताबा घेतील. भूसंपादन मोबदला रक्कम वाटप करताना संपादित होणा-या क्षेत्रातील बाधीत बांधकामाचा मालकीबद्दल अथवा मोबदला रक्कमेतील हिश्श्याबद्दल वाद निर्माण झाल्यास प्रमुख जिल्हा न्यायालय (The principal civil court of original jurisdiction within the limits of whose jurisdiction the land is situated) यांचकडे उक्त अधिनियमाच्या कलम ३ एच (४) नुसार त्यांचे निर्णयासाठी मोबदला रक्कम भरता येईल.

९. जमिनीचा ताबा:-

राष्ट्रीय महामार्ग अधिनियमाच्या कलम ३ ई (१) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी बाधीत झाडे व बांधकामधारकांस संपादित जमिनीच्या हितसंबधितांस हा निवाडा घोषित केल्यावर मोबदला रक्कम स्विकारणेसाठी व त्यावेळी संपादित मिळकतीचा ताबा केंद्र शासनास हस्तांतरित करणेकरिता लेखी नोटीसीव्दारे कळवतील अशा नोटीसी बजावणी झालेवर एकुण ६० दिवसांच्या कालावधीत जर हितसंबधीत व्यक्तींनी ताबा हस्तांवर केला नाही तर उक्त अधिनियमाच्या कलम ३ ई (२) प्रमाणे जिल्हाधिकारी यांना ताबा प्राप्त करणेकरिता सक्षम प्राधिकारी विनंती करतील व जिल्हाधिकारी-यांमार्फत सक्षम अधिकारी यांना अथवा त्यांचेव्दारे प्राधिकृत व्यक्तीस ताबा हस्तांतरित केला जाईल.

१०. विश्लेषण

ज्याअर्थी वरील परिच्छेद क्रमांक ७ मौजे वाडीहुमरमळा ता.कुडाळ येथील संपादनाचे क्षेत्र व त्या अनुषंगाने कायदयातील तरतुदी विचारात घेता परिगणित करण्यात आलेली संपादित जमिनीतील बांधकामे यांच्या मोबदल्याचा एकत्रित सारांश दर्शविण्यात आलेला आहे. तसेच या निवाडयासोबत जोडलेल्या निवाडा पत्रकामध्ये अनुज्ञेय मोबदल्याचा तपशिल विशद करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ च्या कलम ३ जी (१) प्रमाणे सक्षम प्राधिकारी म्हणुन केंद्र शासनाने वाचले १ नुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करुन कायदयाच्या कलम ३ डी नुसार मौजे वाडीहुमरमळा ता.कुडाळ येथील संपादित करण्यात आलेल्या मिळकती मधील यापुर्वीचा पुरवणी निवाडयामध्ये न घेण्यात आलेल्या बाधीत बांधकामांचा पुरक निवाडा या आदेशाव्दारे घोषित झाला आहे, असे जाहिर करण्यात येत आहे.

ज्याअर्थी हा पुरक निवाडा घोषित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने उक्त अधिनियमाच्या कलम ३(ई) व ३ (एच) प्रमाणे सर्व हितसंबंधयांस नोटीसा देण्यात याव्यात.

ज्याअर्थी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ च्या कलम ३ जी प्रमाणे हा उक्त पुरक निवाडा जाहीर झाला असुन अंतिम संपादित जमिनीवरील सर्व हितसंबंध यांचे/ खातेदारांचे सर्व हक्क संपुष्टात येवुन ही मिळकत त्या मिळकतीवर असलेल्या सर्व बांधकामे व इतर मालमत्तांसह तसेच संपुर्ण बोजा विरहीत व भारयुक्त (Face From all encumbrances) होऊन " भारताचे राष्ट्रपती, भारत सरकार, रस्ते व परिवहन व महामार्ग मंत्रालय" यांचे नावे निहीत करणेत येत आहे.

तसेच ज्याअर्थी या निवाडयाव्दारे संपादित जमिन ही सर्व भार मुक्त होऊन केंद्रशासनाचे वरील मंत्रालयाचे नांवे विहीत करण्यांत आली आहे. त्याअर्थी सदर जमिनीच्या आज रोजी पर्यंत अनुज्ञेय असलेल्या सर्वप्रकारचा जमिन महसुल कमी करणेची कार्यवाही करणेचा म्हणजेच सारा माफीचा आदेश देखील याव्दारे देण्यात येत आहे.

आदेश

या व्दारे जाहिर करण्यात येत आहे की,

१. मौजे वाडीहुमरमळा ता .कुडाळ जि. सिंधुदुर्ग येथील राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ च्या कलम ३ डी अंतर्गत अधिसुचित क्षेत्रापैकी पुरवणी निवाडयामध्ये न घेतलेल्या बांधकामांचे उक्त अधिनियमाच्या कलम ३जी नुसार निर्धारित करण्यात आलेले एकूण देय मोबदला रक्कम ₹ १०,९०,०८९/- (₹ दहा लाख नव्वद हजार एकोणनव्वद मात्र) इतका निर्धारीत करण्यात येत आहे .

२. उक्त रकमेच्या १.५०% इतकी आस्थापना खर्चाची रक्कम ₹ १६,३५१/- (₹ सोळा हजार तीनशे एकावन्न मात्र) होत आहे .

३. उक्त रक्कमेच्या १% इतकी सोई सुविधा साठी खर्चाची रक्कम ₹ १०,९०१/-(₹ दहा हजार नऊशे एक मात्र) होत आहे.

४. मौजे वाडीहुमरमळा तालुका कुडाळ जिल्हा सिंधुदुर्ग या गावाच्या पुरक निवाडयाची एकुण रक्कम ₹ ११,१७,३४१/- (₹ अकरा लाख सतरा हजार तीनशे एकेचाळीस मात्र) होत आहे.

५. सर्व खातेदारांस/हितसंबधितांस उक्त अधिनियमाच्या कलम कलम ३ ई व ३ एच नुसार लेखी नोटीसा देवून याबाबत कळविण्यात यावे.

६. एकूण/पुरक निवाडयात नमूद आस्थापना शुल्क सक्षम प्राधिकारी यांनी शासनास जमा करावे.

७. या पुरक निवाडयाव्दारे घोषीत क्षेत्राच्या अधिकार अभिलेखात भोगवटदार सदरी संपादित संस्था म्हणजेच "भारताचे राष्ट्रपती, भारत सरकार, रस्ते व परिवहन व महामार्ग मंत्रालय" यांचे नांवे संपादित क्षेत्रापुरते दाखल करण्यात यावे.

८. उक्त अधिनियमाच्या कलम ३ई व ३एच नुसार पुढील नोटीसा प्रक्रिया पूर्ण केल्यावर म्हणजेच भूसंपादन मोबदला देऊ केल्यावर (offer) वितरण (Disbursement) आणि कायदयात व त्या अनुषंगाने या निवाडयात निर्दिष्ट ताबा प्रक्रिया पुर्ण करावी.

सक्षम अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी कुडाळ
उपविभाग कुडाळ

प्रत:- १) मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. अप्पर जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांजकडे माहीतीसाठी सविनय सादर
३) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी.